दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

• कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ • वर्ष-०१, अंक-२३८ • पृष्ठे-०४ • ठाणे, बुधवार, ०७ फेब्रुवारी २०२४ •RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 •रु.२/-

## राष्ट्रवादी पक्षाचं नाव आणि चिन्ह अजित पवार गटाला, निवडणूक आयोगाचा निर्णय

■मुंबई। यश सावंत,

राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्ह हे अजित पवारांकडे निवडणूक आयोगाने दिले आहे. त्यामुळे आता शरद पवारांच्या हातून राष्ट्रवादी पक्ष गेला असल्याचं चित्र स्पष्ट झालं आहे. अवघ्या काही दिवसांवर लोकसभा निवडणुका आल्या आहेत. त्यामुळे आता शरद पवारांना नवं चिन्ह शोधावं लागणार आहे. याच पार्श्वभूमीवर शरद पवार गटाकडून तयारी देखील सुरु करण्यात आली होती. जर निवडणुक आयोगाचा निर्णय आपल्या बाजूने नाही आला तर पक्षाच्या चिन्ह काय असणार यासंदर्भात शरद पवार गटाची बैठक देखील पार पडली होती. या बैठकीमध्ये शरद पवारांनी चिन्हाची यादी देखील केली होती. त्यामुळे आता शरद पवार लवकरच त्यांच्या पक्षाचं नव नाव आणि चिन्ह जाहीर करतील असं सांगण्यात आलं आहे. जो न्याय निवडणूक आयोगाने शिवसेना दिला होता, तोच आता राष्ट्रवादीला दिला आहे. त्यामुळे आगामी येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये शरद पवार कोणत्या चिन्हावर निवडणूक लढवणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

निवडणूक आयोगाने हा निकाल दिल्यानंतर शरद पवारांकडे दोन पर्याय आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या या निर्णयावर शरद पवार सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतात किंवा आता शरद पवारांना पक्षासाठी नवं नाव आणि चिन्ह शोधावं लागणार आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या निकालावर आता शरद पवार काय प्रतिक्रिया देणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. राष्ट्रवादीच्या आधी शिवसेनेच्या पक्ष आणि चिन्हाचा वाद हा निवडणूक आयोगासमोर होता. त्यावेळी आयोगाने शिवसेना पक्ष आणि चिन्ह हे शिंदे गटाचं असल्याचं सांगत तेच खरी शिवसेना असल्याचं स्पष्ट केलं. शिवसेनेत ज्या काही घडामोडी घडल्या त्याच पद्धतीने घडामोडी या नंतरच्या राष्ट्रवादीमध्ये घडल्या. अजित पवारांनी भाजपला साथ दिल्यानंतर बहुतांश आमदार हे त्यांच्यासोबत गेले आणि राष्ट्रवादीचा वाद हा निवडणूक आयोगामध्ये पोहोचला.



### बुधवारी 4 वाजेपर्यंत नव्या पक्षाचं नाव आणि चिन्हाची सूचना

अजित पवारांच्या गटाला राष्ट्रवादी चिन्ह आणि नाव गेल्यानंतर आता शरद पवार गटाला त्यांच्या नव्या पक्षाचं नाव आणि चिन्हाची सूचना ही बुधवारी संध्याकाळी 4 वाजेपर्यंत द्यावी लागणार आहे.

### शरद पवार गटाला सर्वोच्च न्यायालयात जाण्याची मुभा

शरद पवार गटाला यावर सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा पर्याय खुला आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या या निर्णयानंतर आता शरद पवार गट सर्वोच्च न्यायालयात जाण्याची शक्यता आहे.

## शासन समाजातील प्रत्येक गरजू वंचिताच्या कल्याणासाठी प्रयत्नशील -जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

■ठाणे, दिगंबर जाधव :

लिडकॉम आपल्या दारीह्न या उपक्रमांतर्गत संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय, ठाणे यांच्या वतीने टाऊन हॉल, कोर्ट नाका येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री.अशोक शिनगारे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित जिल्हा कार्यालयाच्या जिल्हा व्यवस्थापक आरती पुराणिक, जिल्हा अग्रणी बँकेचे जिल्हा व्यवस्थापक श्री.नागेंद्र मंचाल, टउएऊचे श्री. कांदळगावकर, श्री.सुबोध बायस, लिडकॉमचे पालघर व्यवस्थापक श्री.दगडखैर आदि मान्यवर उपस्थित होते. सर्वांना संबोधित करताना, समाजातील अज्ञानरुपी अंधार नाहीसा करुन तळागाळातील प्रत्येक गरजू वंचिताचे कल्याण व्हावे, त्या कुटुंबाचा सर्वांगिण विकास व्हावा,



यासाठी शासन सर्व प्रकारे प्रयत्न शील आहे. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांनी जास्तीत जास्त शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी श्री.शिनगारे पुढे म्हणाले की, शासनाचे विविध विभाग, महामंडळे, बँका गरजू लाभार्थ्यांना यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून मदत करण्यासाठी सक्रिय आहेत. बँकांनी सहकार्याची भूमिका घेऊन जास्तीत जास्त गरजू व्यक्तींना कर्ज मंजूरी द्यावी. महामंडळांनी शिबिरे/मेळाव्यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त गरजूंना लाभ द्यावा. स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समाजातील शेवटच्या गरजू व्यक्तीच्या विकासासाठी अतिशय सकारात्मक आणि संवेदनशील आहेत. त्यांचे आपण सर्वांनी अनुकरण करायला हवे. सकारात्मकतेने सर्वांनी गरजू व्यक्तींना मदत करून त्यांचा विकास साधायला हवा. गरजू लाभार्थ्यांनी प्रस्ताव दाखल करून शक्य त्या सर्व योजनांचा लाभ घ्यावा, मात्र त्याचबरोबर आपल्या कामाचा दर्जा, उत्पादनाचा दर्जा उच्च प्रतीचा असेल, यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत. उत्पादन आणि त्याची विक्री व्यवस्था उभी राहायला हवी. शेवटी सामाजिक न्याय विभागाचे सचिव श्री.सुमंत भांगे तसेच लिडकॉमचे व्यवस्थापकीय संचालक धम्मज्योती गजभिये यांचे सकारात्मक काम सर्वांना ऊर्जा देणारे मार्गदर्शक व प्रेरक आहे, असे सांगून जिल्हाधिकाऱ्यांनी आपण सर्वांनी देखील याच सकारात्मकतेने कार्यरत असायला हवे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## 'निवडणूक आयोगाचा निर्णय संविधानाला धरुन', राष्ट्रवादीच्या निकालावर भाजपची प्रतिक्रिया



■मुंबई, नितीन देवळेकर :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापन करणारे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना आज निवडणूक आयोगाने मोठा धक्का दिला आहे. राष्ट्रवादी पक्ष आणि पक्षाचे चिन्ह अजित पवार गटाला देण्यात आले आहे. यामुळे अजित पवारांचा पक्ष हाच खरा राष्ट्रवादी पक्ष असल्यावर आता शिक्कामोर्तब झाला आहे. या निर्णयावर भाजपाचे प्रदेषाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची पहिली प्रतिक्रिया आली आहे.

माध्यमांशी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, 'मी अजित पवारांचे खुप अभिनंदन करतो. त्यांना निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून घडाळ्याचे चिन्ह आणि पक्षाचे नाव दिले. निवडणूक आयोगाने आज अत्यंत महत्वाचा निकाल दिला आहे. जेव्हा आयोगाचा निकाल येतो, तेव्हा तो नियमाप्रमाणे, संविधानाला धरुन असतो. ज्यांच्याकडे जास्त लोकप्रतिनिधी आणि जास्त मतदानाचा कौल, त्यांच्याकडे तो निकाल जातो.'

'मला खात्री आहे की, अजितदादा नक्कीच राष्ट्रवादीचे नेते म्हणून पक्ष वाढीसाठी काम करतील. आता विरोधकांचे विरोध करण्याचे काम आहे, तेच त्यांचे काम करत आहेत. पण, निवडणूक आयोगावर टीका करणे योग्य नाही. आयोग कधीच बायस्ट निर्णय देत नाही. आयोग निर्णय देताना खुप दाखले देते, त्यामुळे आयोगाच्या निर्णयाला सर्वांनी स्वीकारले पाहिजे,' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

## जामिनावर बाहेर असलेल्या गुंड निलेश घायवाळची मंत्रालयात 'Reel'बाजी; विरोधक संतापले



■मुंबई। विशाल कारंडे,

नुकतेच खासदार श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसाला शुभेच्छा देणाऱ्या एका गुंडाचा फोटो व्हायरल झाला. त्यानंतर आता खुद्द मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जामिनावर बाहेर असलेल्या गुंडासोबत फोटो विरोधकांनी ट्विट केला आहे. इतकेच नाही तर या गुंडाने मंत्रालयात इन्स्टा रिलही बनवली. त्यावरून विरोधकांनी सरकारला धारेवर धरलं आहे. राज्याचे विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की,महायुती सरकार राज्यातील गुंडांना अभय देत असून सरकारच्या मेहेरबानीने हे गुंड राजरोस फिरत आहेत. जामिनावर सुटलेला गुंड निलेश घायवाळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना भेटतो. मंत्रालयात बिनधास्त फिरतो. मंत्रालयात रिल्स बनवतो. सामान्य माणूस मात्र रांगेत उभा असतो. यालाच अच्छे दिन म्हणायचं का? असा सवाल करत विजय वडेट्टीवार यांनी गुंडांना राजाश्रय मिळत असल्याच्या मुद्यांवरून सरकारवर तोफ डागली.

तसेच रोज एक नवा गुंड सरकारच्या भेटीला येत असून सरकारमधील मंत्र्यांना, काही मंत्र्यांच्या मुलांना याचे काहीच वाटत नाही. म्हणजे सरकार गुंडांना अभय देत असून या सरकारच्या काळात गुंडाराज सुरू असल्याचे स्पष्ट आहे. गुंड मंत्रालयात बिनधास्त फिरतायत आणि सामान्य जनता मात्र बाहेर रांगेत उभा असते. याची सरकारला लाज देखील वाटत नाही अशी टीका वडेट्टीवारांनी केली आहे. दरम्यान, सध्याचे सरकार म्हणजे सरकार निर्मित गुंडाराज आहे. एकीकडे सर्वसामान्य गोर-गरीब जनतेला मंत्रालयाच्या उंबरठ्यात तासनतास ताटकळत उभं राहावं लागतं. महिनोन्महिने खेटा घालाव्या लागतात. हे गुंड थेट मंत्रालयाच्या प्रांगणात रिल्स शूट करत आहेत. सरकार केवळ गुंडांच्या आणि मुजोरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा हा आणखी एक दाखला आहे अशा शब्दात राष्ट्रवादी शरद पवार गटानेही सरकारवर निशाणा साधला.

### संजय राऊतांनी शिंदेंना सुनावले..



महाराष्ट्रासारखं मोठं राज्य हा गुंडगिरीचा सर्वात मोठा अड्डा झालाय. बेकायदेशीर जे मुख्यमंत्री नेमलेत ते गुंडांना पोसतायेत. पोलीस स्टेशनमध्ये आमदार गोळीबार करतायेत. मोदी काही बोलले का? असं सांगत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना टार्गेट केले. दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, राज्यातील मुख्यमंत्र्यांना वर्षा बंगल्यावर, मंत्रालयात ज्याप्रकारे गुंड टोळ्या येऊन भेटतायेत. शासकीय निवासस्थानी खून, दरोडे, बलात्कार या गुन्ह्यात जामीनावर सुटलेले आणि बाहेर काढलेले या गुंड टोळ्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटून नक्की काय चर्चा करत आहेत. या गुंड टोळ्याचा वापर कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी मुख्यमंत्री करणार की उद्याच्या निवडणुकीत विरोधकांचे मुद्दे पाडण्यासाठी करणार आहेत असा सवाल राऊतांनी उपस्थित केला.

## पेपर फुटीला बसणार आळा ! लोकसभेत सार्वजनिक परीक्षा विधेयक मंजूर



■नवी दिल्ली, प्रगती शर्मा:

लोकसभेत सार्वजनिक परीक्षा (अन्याय प्रतिबंधक) विधेयक मंजूर करण्यात आले आहे. पेपर फोडणाऱ्यांवर कारवाई करणे हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे. या विधेयकात अतिशय कडक तरतुदी करण्यात आल्या आहेत.

या विधेयकानुसार पेपरफुटीप्रकरणी दोषी आढळल्यास 10 वर्षांची शिक्षा आणि 1 कोटी रुपयांचा दंड होऊ शकतो. जर एखादी व्यक्ती दुसऱ्या उमेदवाराच्या जागी परीक्षेला बसायला गेली आणि ती दोषी आढळली, तर त्याला 3 ते 5 वर्षांच्या कारावासाची शिक्षा होईल. या विधेयकाद्वारे वढरउ, ररउ इत्यादी भरती परीक्षा आणि ठएएळ, खएए आणि उवएळ सारख्या प्रवेश परीक्षांमध्ये पेपर फुटण्याच्या घटनांना आळा बसेल. फसवणूकीला आळा घालण्यासाठी किमान तीन ते पाच वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे आणि फसवणुकीच्या संघटित गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्यांना पाच ते दहा वर्षांचा तुरुंगवास आणि किमान एक कोटी रुपयांचा दंड भरावा लागेल. या विधेयकाची गरज आणि महत्त्व विशद करताना केंद्रीय मंत्री डॉ जितेंद्र सिंह म्हणाले की, गेल्या काही वर्षांत प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे आणि संघटित फसवणुकीमुळे परीक्षा रद्द झाल्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे हित बाधित झाले आहे.

## वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांसोबतची बैठक निष्फळ ठरल्यामुळे राज्यातील निवासी डॉक्टर पुन्हा संपावर जाणार

■मुंबई, योगेश होळंब

निवासी डॉक्टरांनी पुन्हा एकदा राज्यव्यापी संपाची हाक दिली आहे. प्रलंबित मागण्या पूर्ण होत नाहीत म्हणून डॉक्टरांनी संप पुकारला आहे. निवासी डॉक्टरांचा संप मोडून काढण्यासाठी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी बैठक घेतली होती. पण ही बैठक निष्फळ ठरल्यामुळे निवासी डॉक्टर संपावर जाण्याबाबत ठाम आहेत. बुधवारी संध्याकाळी 5 वाजल्यापासून निवासी डॉक्टर संपावर जाणार आहेत. मात्र आपत्कालीन सेवा संपादरम्यानही सुरु राहणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. निवासी डॉक्टरांच्या मार्ड संघटनेकडून एक पत्रक जारी करण्यात आले आहे. या पत्रकात ते म्हणाले आहे की, गेल्या अनेक दिवसांपासून राज्यातील निवासी डॉक्टरांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. गेल्या एक वर्षभरात मध्यवर्ती मार्ड संघटनेने अनेकवेळा यासाठी सरकारकडे पाठपुरवठाही केला. पण प्रत्येकवेळी प्रशासनाकडून आश्वासनांचे गाजर हे देण्यात आले. प्रत्यक्षात कोणतीही दखल याबद्दल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे विविध प्रलंबित मागण्यासाठी मध्यवर्ती मार्ड संघटनेने 7 फेब्रुवारीला संध्याकाळी पाच वाजेपासून संपावर जाणार असल्याचं निश्चित केल आहे. त्याच वेळी संपापूर्वीच होणाऱ्या रुग्णसेवेवरील परिणामासाठी त्यांनी या पत्रकाद्वारे माफी मागितली आहे. सोबतच संपाच्या काळात सर्व अत्यावश्यक सेवा चालू राहणार असल्याचं मार्डच्या वतीने सांगण्यात आलंय.



### निवासी डॉक्टरांच्या प्रमुख मागण्या

- निवासी डॉक्टरांना दिले जाणारे विद्यावेतन हे प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत त्यांच्या खात्यावर जमा केलं जावं.
- निवासी डॉक्टरांना दिले जाणारे विद्यावेतन ही केंद्रीय संस्थांमध्ये दिल्या जाणाऱ्या विद्यावेतनाप्रमाणे असावं.
- निवासी डॉक्टरांसाठी पुरेशा प्रमाणात हॉस्टेलची व्यवस्था करावी.

निवासी डॉक्टरांना दिले जाणारे त्यांचे हक्काचे विद्यावेतन हे त्यांना कधीही वेळेवर देण्यात येत नसल्याचंही त्यांनी या पत्रकात नमूद केलं आहे. अनेक महिन्यांसाठी विद्यावेतन थकीत असल्यामुळे, निवासी डॉक्टरांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत असल्याचं त्यांनी सांगितल आहे. निवासी डॉक्टरांसाठी पुरेशा प्रमाणात हॉस्टेल्स नाहीत. त्यामुळे दोन-तीन डॉक्टरांना एकच खोलीत अत्यंत अडचणीत राहण्याची वेळ ओढावली आहे. वेळोवेळी प्रशासनाला या समस्यांबद्दल दाद मागितली आहे. पण फक्त तोंडी आश्वासन दिलं जातं म्हणून अखेर निराश होऊन आम्हाला संपावर जावं लागत आहे, असं त्यांनी सांगितलं.

## उद्धव ठाकरेंचा अजित पवारांना धक्का, दंड थोपटत म्हणाले 'महाराष्ट्रात हेकडांपेक्षा जास्त...'

■मुंबई। विशाल पाटील

उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस गटाला मोठा धक्का दिला आहे. पैठणचे राष्ट्रवादी काँग्रेस (ठउढ) पक्षाचे दत्ता गोर्डे यांनी आज उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यांच्यासह भाजपाचे डॉ राजू डोंगरे, एमआयएमचे डॉ शोएब हाश्मी यांनीही पक्षात प्रवेश केला आहे. दत्ता गोर्डे यांचा पक्षप्रवेश अजित पवारांच्या राष्ट्रवादीसाठी मोठा धक्का मानला जात आहे.



मातोश्रीवर तिघांचाही पक्षप्रवेश पार पडला. दरम्यान यानंतर उद्धव ठाकरेंनी मातोश्रीबाहेर जमलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मी गेले 4 दिवस महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर फिरत होतो. करोना काळात मुख्यमंत्री असताना माझं कुटुंब, माझी जबाबदारी संकल्पना राबवली होती. आता महाराष्ट्र आणि देशावर आलेल्या दुसऱ्या संकटात माझं कुटुंब सोबत आहे की नाही हे पाहत होतो, असं उद्धव ठाकरे म्हणाले. पुढे त्यांनी सांगितलं की, महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर दोन चक्रीवादळं आदळली. पण मागील 4 दिवसात मला दिसलं की, एक भगवं वादळ आता दिल्लीच्या तख्तावर आदळणार आहे आणि हुकूशाहीची चिरफाड करणार आहे. काहींच्या मनात इंडिया आघाडी, महाविकास आघाडी यांच्यात पर्याय कुठे आहे असा प्रश्न आहे. पण हुकूमशाहीला पर्याय द्यायचा नसते. आधी ती उखडून फेकून द्यायची असते, हाच पहिला पर्याय असते, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

## शर्मिला ठाकरेंचा उद्धव ठाकरेंवर पुन्हा हल्लाबोल, म्हणाल्या 'कोविड काळात बंगल्यात..'



■मुंबई। सचिन कदम

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे गेल्या काही दिवसांपासून अनेक कार्यक्रमात दिसत आहेत. तसंच, लोकसभा निवडणूक मनसे लढवणार असल्याचं जाहीर झाल्यापासून शर्मिला ठाकरे अनेकाविध राजकीय भाषणेही करत आहेत. या भाषणांतून त्या सातत्याने सत्ताधारी युती आणि महाविकास आघाडीवर तोफ डागत आहेत. काल (५ फेब्रुवारी) पुण्यातील एका कार्यक्रमात त्यांनी कोविड काळात सत्ताधारी पक्ष बंगल्यात बसून होते, अशी अप्रत्यक्ष टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर केली. पुण्यातील कोंढवा गावातील प्रथम महिला नगरसेविका आरती बाबर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

शर्मिला ठाकरे म्हणाल्या, मार्च- एप्रिल महिन्यापासून लोकसभेच्या निवडणुका सुरू होतील. मग ऑक्टोबरमध्ये आमदारकीच्या निवडणुका. पुढच्या वर्षी महापालिकेच्या निवडणुका लागतील. पण तरीही आमची कामं थांबत नाहीत. आम्ही निवडून येवो किंवा न येवो आमच्या पक्षातील कामे सुरू असतात. कोविड काळात आपल्या पक्षाने जेवढी काम केलं तेवढी कामं कोणत्याही पक्षाने केली नव्हती. तेव्हा सगळे सत्ताधारी मंत्री बंगल्यात बसले होते. आपला पक्ष रस्त्यावर होता. आपली चांगली चांगली पोरं कोविडमध्ये दगावली. तरीही मी अभिमानाने सांगेन की आमचा पक्ष एवढी चांगली कामं करतोय तर तुमचा कृपाशिर्वाद असाच राहुदे, असंही आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं. आपल्याकडे एवढे चांगले उमेदवार होते, आपण एवढी कामं केली, पण लोकांनी (मतदानावेळी) चूक केली. पण यावेळी लोक चूक करणार नाहीत. तुमच्या फोनवर उपलब्ध असलेले चांगले उमेदवार आहेत. हे उमेदवार तुमची कामं पटापट करतात. त्यांना तुम्ही तिथे नेऊन बसवा. त्यांना नक्कीच मला वरच्या स्तरावर बघायचं आहे,

## पुण्यात गजानन मारणे, निलेश घायवळसह २००-३०० गुंडांची परेड, पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची कडक समज



■पुणे। अभिजीत येरल्लू,

अमितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारताच शहरातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढण्यास सुरुवात केली आहे. पोलीस आयुक्तालयात मंगळवारी शहरातील कुख्यात गुंड गजानन मारणे सर्व गुन्हेगारी टोळ्यांतील सराईत गुन्हेगारांची परेड घेण्यात आली. अमितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारताच शहरातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढण्यास सुरुवात केली आहे. पोलीस आयुक्तालयात मंगळवारी शहरातील कुख्यात गुंड गजानन मारणेसर गुंडांच्या टोळ्यांतील सराईत गुन्हेगारांची परेड घेण्यात आली. रेकॉर्डवरील गुन्हेगारांना बोलावून सज्जड दम भरण्यात आला. नीलेश घायवळ, बाबा बोडके, बंडू आंदेकर, टिपू पठाण, कंचीले अशा प्रमुख १५ गुन्हेगारी टोळ्यांसह नव्या उभरत्या ५० टोळ्यांतील सुमारे २६७ अधिक सराईत गुन्हेगारांना परेडसाठी पोलीस आयुक्तालयात हजेरीसाठी बोलावण्यात आले होतं. कोणताही गुन्हा करायचा नाही. गुन्हेगारीस प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पाठिंबा द्यायचा नाही.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

# "वॉलेट" सांभाळा !



**का**रभारात पारदर्शकता नसेल तर संशयाचे धुके गडद होते. तसे होणे हे संबंधित कंपनी आणि तिचे ग्राहक यांच्यावर परिणाम करतेच; पण एकूण वित्तीय स्थैर्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण करते. नियामकांची भूमिका म्हणूनच महत्त्वाची. सर्वच व्यवहार; त्यातही प्रामुख्याने आर्थिक व्यवहार सुरळीत चालायचे असतील तर नियमांचे भक्कम कोंदण अत्यंत आवश्यक असते. नियमांची चौकट आणि तिचे कसोशीने पालन हा एखादी व्यवस्था विकसित की मागासलेली हे ठरविण्याचा एक महत्त्वाचा निकष असतो. परंतु ही चौकटच कमकुवत असेल, किंवा चौकट भक्कम; पण अंमलबजावणी ढिसाळ असेल तर गोंधळ तर माजतोच; पण त्या गोंधळात अनेक लोक विनाकारण भरडले जातात. भारतात केवळ वित्तीय क्षेत्राचा विचार केला, तर अनेक प्रकरणांत सर्वसामान्यांना असा फटका बसला आहे.

अधिक व्याजाचे आमिष दाखवून फसविणाऱ्या कंपन्यांपासून ते बुडालेल्या बॅंकांपर्यंत अनेक प्रकरणांत सर्वसामान्यांची ससेहोलपट झाली. पुरेशी खबरदारी न घेता कर्जवाटप करणाऱ्यांमुळे बॅंक रसातळाला गेली असेल तर त्यात सर्वसामान्य ठेवीदारांचा दोष काय असतो? परंतु दोष एकाचा, शिक्षा भलत्यालाच असे अनेकदा घडते. त्यामुळेच अशा आर्थिक बेबंद कारभाराला वेळीच पायबंद घातला जाणे, ही बाब फार महत्त्वाची ठरते. पेटीएम बॅंकेचे व्यवहार बंद करण्याबाबत रिझर्व्ह बॅंकेने जानेवारीच्या अखेरीस जारी केलेले निर्बंध हे त्याचे सर्वात ताजे आणि ज्वलंत उदाहरण म्हणावे लागेल. या निर्बंधांची माहिती कळताच त्या कंपनीच्या शेअरचा भाव कोसळला आणि सर्वसामान्य गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले.

'पेटीएम'चे वॉलेट फेब्रुवारीअखेर बंद होणार असल्याने 'फास्टॅग'सह अनेक सेवांसाठी 'पेटीएम'चा उपयोग करणाऱ्या लाखो ग्राहकांत अस्वस्थता निर्माण झाली. आता अन्य कोणत्या बॅंकेमार्फत हे व्यवहार पुढे चालू ठेवता येतील, याची बोलणी सुरू आहेत; परंतु पेच या थरापर्यंत गेलाच कसा, हा प्रश्न निर्माण होतोच. कंपनीने आरोप फेटाळले असून २९ फेब्रुवारीनंतरही ग्राहकांना अडचण येणार नाही, असा दावा केला आहे. तरीही समोर आलेल्या प्रश्नांची दखल घ्यावी लागेल. झटपट आर्थिक व्यवहार होण्यासाठी डिजिटल सुविधा तयार होणे ही मोठीच सोय आहे, याविषयी दुमत नाही. हेच ओळखून तंत्रज्ञानाधारित वित्तीय सेवा देणाऱ्या कंपन्या पुढे सरसावल्या. गुगल पे, फोन पे आदी सुविधा वापरून पैशाचे विनासायास हस्तांतर घडू लागले; परंतु ही 'ॲप' केवळ हस्तांतराची सेवा देतात, तिथे पैसे ठेवता येत नाहीत. त्यामुळेच या हस्तांतरसेवेला 'वॉलेट'ची जोड देणारे 'पेटीएम' सारखे स्टार्ट अप लोकप्रिय झाले. नोटाबंदीनंतरच्या काळात तर कंपनीला वाढायला 'सुपीक जमीन'च मिळाली. 'पेटीएम'मार्फत झालेल्या व्यवहारांची एकूण रक्कम आहे आठ हजार कोटी रुपये. दुकानांमध्ये 'पीटीएम'मार्फत खरेदी करणाऱ्या ग्राहकांची संख्या आहे जवळजवळ तीन कोटी. बॅंक खात्यात सर्वसामान्य ठेवीदारांकडून 'केवायसी' (नो युवर कस्टमर) भरून घेतले जाते, एवढेच नव्हे तर वारंवार ते अपडेटही करावे लागते. ज्या नावाने खाते उघडले आहे, तीच व्यक्ती व्यवहार करते आहे ना, हे तपासले जाते.

'पेटीएम'ला परवाना देताना जे नियम घालून देण्यात आले होते, त्यात 'केवायसी'बाबतचे नियम फार कडक नव्हते. या फटीचा फायदा घेऊन एकाच खात्यावर अनेक व्यवहार केले गेले असू शकतात. मोठ्या प्रमाणात काळा पैसा पांढरा करण्याचे प्रयत्न या प्लॅटफॉर्ममार्फत झाल्याचा संशयही आहे. शिवाय पेटीएम समूहातील अन्य कंपन्यांना या प्लॅटफॉर्मचा फायदा करून दिला गेला का, याविषयीदेखील प्रश्न उपस्थित झाला आहे. 'आरबीआय'ने स्पष्टपणे कारणे नमूद केलेली नाहीत; पण जे कठोर पाऊल उचलले आहे, ते पाहता या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येते. आता या सगळ्याची चौकशी होऊन सत्य बाहेर येईल, अशी अपेक्षा आहे; परंतु जे घडले त्यातून मिळालेल्या धड्यांकडे दुर्लक्ष होता कामा नये.

# MINT LEAVES TEA ON EMPTY STOMACH



**O**rdinary mint leaves aren't just your typical ingredient, they're also something of a superfood, offering innumerable health advantages. A favorite way to reap these benefits is over a hot cup of mint tea, especially when consumed in the morning, on an empty stomach. This practice can have multiple positive impacts on your health. Let's delve into 7 possible outcomes of starting your day with mint tea. Mint Leaves On Empty Stomach: 7 Amazing Hidden Health Benefits You Should Know Here are 7 things that can happen inside your body when you start your day with a cup of freshly brewed mint leaves tea every morning. Dating back centuries, mint leaves have been a go-to remedy for digestion-related issues. Taking mint tea on an empty stomach can spark the creation of digestive enzymes, enhancing digestion and sidestepping problems like bloating or indigestion. Are mornings often synonymous with nausea for you? Mint tea offers a way out!

The soothing menthol in the leaves can aid in taming nausea and vomiting, making your mornings much more pleasant. Beginning your day with mint tea can put a spring in your step. The natural stimulants within the leaves can augment alertness and focus, making mint tea the perfect morning starter for an energetic day. Mint leaves are widely acclaimed for their breath-freshening prowess. Sipping mint tea first thing in the morning can annihilate mouth bacteria, consequently lowering bad breath occurrences while upping oral hygiene. Are you on your weight loss journey? Try to begin your day with a cup of mint-leaf tea. Compounds in the mint leaves can help control appetite and increase metabolism, thus promoting weight loss. Mint leaves possess pain-relieving abilities, offering a quick respite from headaches and migraines. A morning cup of mint tea can help soothe headache-induced discomfort and induce relaxation. Packed with antioxidants and vitamin C, mint leaves are great for giving the immune system a boost. A morning ritual of mint tea can energize your immune system, helping you fight off common ailments.

# आल्याचा चहा प्यायले असालच, कांद्याचा चहा सेवन करून बघा



**सा**मान्यपणे लोक चहा पितात त्यात साखर, चहा पावडर आणि दूध असतं. तर काही लोक आरोग्य चांगलं राहण्यासाठी लिंबाचा चहा पितात किंवा ग्रीन टी पितात. चहामध्ये आलंही टाकलं जातं. पण अनेकांना हे माहीत नाही की, कांद्याचाही चहा केला जातो आणि त्याचे आरोग्याला अनेक फायदे मिळतात.

कांद्याचा चहा हा आयुर्वेदात एक औषधी मानलं जातं. जर हिवाळ्यात तुम्ही कांद्याचा चहा घेतला तर तुम्हाला थंडी वाजणार नाही. सोबतच तुमच्या शरीराची रोगप्रतिकारक क्षमताही याने वाढते. तुळस, आलं, वेल या पदार्थांच्या चहाबाबत तुम्हाला माहीत आहेच, पण कांद्याच्या चहाबाबत तुम्ही कधी ऐकलं नसेल. ऐकायला भलेही हे अजब वाटत असलं तरी कांद्याच्या चहाचे फायदे मात्र अनेक आहेत.

कांद्याचा चहा तयार करण्यासाठी पाणी उकडून त्यात कापलेला कांदा टाका आणि आणखी चांगल्याप्रकारे उकडू द्या. त्यानंतर हे पाणी गाळा. नंतर यात लिंबाचा रस किंवा चवीसाठी ते बँगी टाकू शकता. गोडव्यासाठी यात तुम्ही मध टाकू शकता.

कांद्याचा चहा पिण्याचे मुख्य फायदे :

1) डायबिटीजच्या रुग्णांसाठी हा चहा फार फायदेशीर ठरु शकतो. तसेच वजन कमी करण्यासाठीही कांदा प्रभावी मानला जातो.

2) एका शोधानुसार, कांद्याचा चहा टाइप-२ डायबिटीजमध्ये आराम देण्यासाठी फायदेशीर ठरतो. तसेच कांद्याच्या चहाने फ्री रेडिकल्स नष्ट करण्यासाठी मदत करु शकतात.

3) कांद्याचा चहा कॅन्सरच्या पेशींचा विकास रोखण्यासही फायदेशीर ठरतो. खासकरुन कोलोन कॅन्सरमध्ये हा चहा फायदेशीर मानला जातो.

4) झोप न येण्याची समस्या असेल तर कांद्याचा चहा फायदेशीर आहे. याने तुम्हाला चांगली झोप येईल.

5) कांद्याच्या चहाचं सेवन केल्याने हायपरटेंशनपासून बचाव होण्यास मदत मिळते. त्यासोबतच रक्ताच्या गाठी होणे रोखण्यासही याने मदत मिळेल.

# अशोक सराफ यांच्या घरी पोहोचले आशुतोष अन् तेजश्री प्रधान; शुभ्रा-बबड्याला एकत्र पाहून चाहते खूश



**'हो**णार सून मी या घरची' या सुपरहिट मालिकेनंतर अभिनेत्री तेजश्री प्रधानची गाजलेली मालिका ती म्हणजे 'अग्गंबाई सासूबाई'. यामध्ये निवेदिता सराफ यांनी तिच्या सासूची भूमिका केली होती. तर अभिनेता आशुतोष पत्की तिच्या नवऱ्याच्या म्हणजेच बबड्याच्या भूमिकेत होता. तर तेजश्री शुभ्रा ही व्यक्तिरेखा साकारत होती. प्रेक्षकांना शुभ्रा आणि बबड्याची जोडी जाम आवडली. कित्येक दिवसांनंतर ही जोडी पुन्हा एकदा एकत्र दिसली आहे. त्यांचा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतोय.

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना नुकताच 'महाराष्ट्र भूषण' जाहीर झाला. यानिमित्ताने संपूर्ण कलासृष्टीतून त्यांचं भरभरुन अभिनंदन करण्यात आलं. अनेकांनी अशोक सराफ यांची घरी जाऊन प्रत्यक्ष भेट घेत अभिनंदन केलं. यानिमित्ताने तेजश्री आणि आशुतोषही अशोक सराफ यांच्या घरी पोहोचले. त्यांना फुलांचा गुच्छ देत त्यांनी फोटोही काढला. निवेदिता सराफ यांनी हा फोटो त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर शेअर केला आहे. तेजश्री आणि आशुतोषला एकत्र पाहून चाहते मालिकेच्या आठवणीत रमले. शुभ्रा आणि बबड्या अशी कमेंट करत चाहत्यांनी परफेक्ट फोटो अशी प्रतिक्रिया दिली आहे. मालिकेत बबड्या हा आसावरीचा म्हणजेच निवेदिता सराफ यांचा लाडका असतो.

# 'थोडीशी गेंड्याची कातडी...', बोल्डनेसवरुन होणाऱ्या सततच्या ट्रोलिंगवर सई ताम्हणकरचं स्पष्ट मत



**म**राठमोळी अभिनेत्रीसई ताम्हणकर तिच्या अभिनयामुळे नेहमीच सर्वांना प्रेमात पाडते. सई मोजक्या भूमिका करते पण अगदी परफेक्ट करते. तिचा वेगळा चाहतावर्ग आहे. सई ताम्हणकरने मराठीसोबतच हिंदीतही काम केलं आहे. सई तिच्या बोल्डनेसपणामुळेही कायम चर्चेत येत असते. इतकंच नाही तर तिच्या प्रत्येक पोस्टवर नेटकरी तिला ट्रोल करतात. या ट्रोलिंगवर आता सई ताम्हणकरने भाष्य केलं आहे. सई ताम्हणकरने नुकतंच 'मुंबई तक'ला मुलाखत दिली. मराठी चित्रपटसृष्टीत तू बोल्डनेस आणला आहेस. पण बोल्ड सीन्स केल्यामुळे किंवा बोल्ड भुमिका घेतल्यामुळे तुला ट्रोल केलं जातं. या ट्रोलिंगवर तु काय विचार करतेस, असा प्रश्न सईला विचारण्यात आला. यावर ती म्हणाली, ग्लॅमर, प्रसिद्धी आणि स्तुतीसह ट्रोलिंगही या प्रोफेशनचा घट्ट भाग आहे. मला असं वाटतं की त्याकडे दुर्लक्ष करावं. एखादी व्यक्ती जेव्हा प्रसिद्ध असते. चार चौकटीच्या बाहेर काम करू पाहते. तेव्हा तिला ट्रोल केलं जातं. कधी-कधी काही करत नाही, म्हणूनही ट्रोल केलं जात'. वैयक्तीक आयुष्यावर होणाऱ्या ट्रोलिंगवर ती म्हणाली, 'ट्रोलिंगचा मनावर परिणाम होते. पण, ट्रोलिंगवर आपली एनर्जी खर्च न करणे हाच चांगला उपाय आहे. आम्ही कुणाची तरी बहिण, मुलगी आणि ताई आहोत, हे लोक कमेंट करताना विसरतात. मला असं वाटतं की प्रोफेशमध्ये असताना थोडीशी गेंड्याची कातडी ठेवणं गरजेचं आहे. ट्रोलिंग करुन ते तुमचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेजर तुम्ही तिकडे दुर्लक्ष करण्यात यशस्वी झालात, तर तुम्ही जिंकलात'.

# प्रसिद्ध अभिनेत्री जुई गडकरीला देव, अध्यात्मावर विश्वास आहे का? विचारल्यावर दिलं हे उत्तर...



**छो**ट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री जुई गडकरीनं उत्तम अभिनयशैली आणि सोज्वळपणा यांच्या जोरावर अल्पावधीत लोकप्रियता मिळवली. ती सोशल मीडियावर चर्चेत असते. जुई 'ठरलं तर मग' या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जुईच्या इतर मालिकांप्रमाणेच ही मालिकादेखील प्रचंड यश मिळवताना दिसतेय. प्रेक्षक मालिकेला भरभरून प्रेम देत आहेत. अलिकडेच जुईने एक मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये तिनं अध्यात्मावर भाष्य केलं.

अलिकडेच जुईने राजश्री मराठीच्या 'तिची गोष्ट' या सेगमेंटमध्ये हजेरी लावली होती. या मुलाखतीमध्ये तिनं आध्यात्मावर भाष्य केलं आहे. तुझी आध्यात्मिक बाजू खूप भक्कम आहे. तू दत्तजयंतीला कर्जतला जातेस. आजार आणि काम यामध्ये तुला तुज्या आध्यात्मिक बाजूचा फायदा झाला का, असा प्रश्न केला. यावर ती म्हणाली, 'जेव्हा आपलं काही चांगलं घडत नसतं. तेव्हा आपण म्हणतो की पत्रिकेमध्ये गुरूबळ कमी आहे. तेव्हा तुम्ही काय करु शकता. गुरुचे पाय धरा. त्याला शरण जा'.

## HEALTH AND SPORTS

### NO SHUBMAN GILL FOR INDIA ON DAY 4 AGAINST ENGLAND AS BCCI DROPS CRUCIAL INJURY UPDATE



**NEW DELHI:** Mumbai Indians head coach Mark Boucher revealed the captaincy snub of Rohit Sharma stating that wanted to free him as a batter given that he did not have a great run in the past IPL seasons. One of the most successful IPL franchises, Mumbai Indians bought back their star all-rounder Hardik Pandya after his successful two-year campaign with Gujarat Titans. They also named him as captain and have snubbed Rohit who led the team to five IPL titles. "We saw a window to get Hardik back as a player," Boucher told South Africa-based podcast 'Banter with The Boys'. "We still want him (Rohit) as a player, absolutely because we know he has some great value to add and just go out there and actually enjoy it, without the hype of being the captain," he said. "He probably hasn't had the best couple of seasons with the bat but he has done well as captain and I just thought after speaking with whole Mumbai Indians group, we thought may be this is an opportunity for him to step in for his last year or so," the coach added. While the hype around an India's skipper will still be there but Boucher expects Rohit to operate more freely with the bat. "He will still captain India so that hype is going to be there but when he steps into the IPL, may be take that extra bit of pressure off him as captain and may be we get the best out of Rohit Sharma...," he hoped. "...playing with nice smile on his face and spending time with beautiful family that he has got, there's no easy way to do it," he said.

### INDIA SET TO CLASH WITH ZIMBABWE IN FIVE T20IS



**NEW DELHI :** India set to clash with Zimbabwe in five T20Is BCCI secretary Jay Shah said, "The BCCI has always played a pioneering role in contributing to the global cricketing community. We understand that it is a period of rebuilding for Zimbabwe, and Zimbabwe Cricket needs our support at this juncture. "Our steadfast commitment to touring and supporting fellow member boards aligns with our principle of bringing about a positive transformation within the cricketing landscape. The BCCI will do its best to make bilateral cricket stronger and commercially more viable. "Our pledge to support Zimbabwe Cricket reflects a shared vision for the growth and prosperity of cricket on the international stage." The Indian squad for the Zimbabwe tour is yet to be announced. Both teams will first clash at the Harare Sports Club for the first T20I, followed by the second game to be played at the same venue. The final T20I will also be played at Harare Sports Club on July 14."We are absolutely thrilled to be hosting India for a T20I series in July in what will be our biggest international attraction at home this year. The game of cricket has always immensely benefited from India's influence and dedication to the sport, and I would like to say a huge thank you to the BCCI for committing to tour Zimbabwe once again," ZC Chairman Mr Tavengwa Mukuhlani said in an official statement."The significance and magnitude of this tour cannot be over-emphasised, especially as it is coming at a time we are working round the clock to re-establish ourselves as a force to reckon with at the highest level of the game," he added.



### "THERE IS A LOT OF WORK TO BE DONE", ZAHEER KHAN ON INDIA'S BATTING

**NEW DELHI :** The team's batting lineup did not fire as a collective unit as the hosts rode on Jaiswal's double century in the first essay and Gill's century in the second innings. Also, the exceptional show put on by Jasprit Bumrah helped India to secure a 106-run win. "There are a few concerns when you look at the team batting is something that they will be talking about because under these conditions, on this sort of a surface, we have seen India do better," Zaheer said on JioCinema. Zak Crawley was the lone star performer for England in both the innings. The visitors were able to score 292 runs."You look at England's second innings, there is only one half-century and they still managed to get close to 300. That is what collective effort can do. We have seen two brilliant innings Yashasvi Jaiswal and Shubman Gill, but with the bat, there is a lot of work to be done," Zaheer added. In a dominant position after taking a 190-run first innings lead India had collapsed to a shocking 28-run defeat in the series opener and was under tremendous heading into the second Test. India also played the second test match without the services of Virat Kohli, KL Rahul, Ravindra Jadeja and Mohammed Shami. "If you are one down in the series, you need that aggression, fight and belief to make sure that it is 1-1 after the end of the game. And I think Rohit was able to bring out those individual performances from the players." The third Test of the five-match series, which is part of the current World Test Championship (WTC) cycle, will begin on February 15 in Rajkot.

### BOOST HEALTH AND HAPPINESS WITH KIWIFRUIT ; KNOW MORE BENEFITS FROM NUTRITIONIST



Want to give your mental health a boost in two weeks or less? You can trust Kiwifruit to ease mood swings and increase flow of happy hormones. Rich in Vitamin K and D, kiwifruit aids in mood regulation, manages depression, and improves mental well-being. A new study done at University of Otago and published in

BENEFITS OF KIWIFRUIT

1. Vitamin K helps in blood clotting and Vitamin D absorption: Kiwi fruit stands out as a reliable source of Vitamin K, a pivotal nutrient known for its indispensable role in blood clotting mechanisms and its ability to assist in the absorption of Vitamin D.

2. Efficient protein digestion support : Kiwi takes centre stage in aiding the digestion of proteins, contributing significantly to the efficient breakdown of dietary proteins. This digestive support promotes better nutrient absorption and utilization.

3. Potassium aids in kidney health and stone prevention : Abundant in potassium, kiwi plays a vital role in fostering a diet conducive to kidney health. Its potassium content helps prevent the formation of stones, contributing to overall kidney well-being.

4. Mood regulation and mental well-being : Beyond its nutritional benefits, kiwi exhibits properties that contribute to mood regulation and the control of depression, fostering mental well-being.

5. Weight management with low-calorie, high-fibre content : Kiwi emerges as an excellent choice for those focused on weight reduction due to its dual combination of being low in calories and rich in dietary fibre. This not only aids in weight management but also supports overall digestive health.

6. Anti-inflammatory powerhouse and immune support : Kiwi's reputation as an anti-inflammatory powerhouse is complemented by its richness in Vitamin C. These properties work synergistically to promote a robust immune system, shielding the body from various illnesses and supporting overall health.

7. Metabolic boost and immune enhancement : Incorporating kiwi into your diet goes beyond mere nutrition; it actively contributes to an increase in metabolism. Additionally, the fruit's inherent immune-enhancing qualities make it a valuable addition to a well-rounded, health-conscious diet, fortifying the body's defences against external threats.

### ORGANIC DIFFERENCE : HOW NATURAL INGREDIENTS ENHANCE ORAL HEALTH, DENTAL HYGIENE

Natural ingredients can enhance oral care, much like in the past when people relied on them before chemical-infused products came in the market. As people prioritise health, oral care is shifting towards natural ingredients. In an interview with HT Lifestyle, Dr Neha Chhabra, MDS and Co-Founder of Bentodent, shared, "Back in the day, the Neem branch was a go-to for preventing tooth decay and gum diseases. Today, with dental health becoming a concern due to poor eating habits and other factors, natural ingredients come in handy. They possess antibacterial and antioxidant properties, being gentle on teeth and gums." She added, "Many toothpastes and mouthwashes now boast natural ingredients like bentonite clay, cardamom, betel leaf, neem, tea tree oil and charcoal, which helps to tackle oral issues and brighten teeth. However, It's important to understand that various oral health concerns may require different remedies, hence both chemical and natural products can play a role in addressing specific conditions." Dr Aakash Shah, Head of Dental Department at Jehangir Hospital in Pune, said, "Many are choosing products that harness the power of nature, avoiding conventional options with synthetic chemicals. This trend signifies a broader move towards holistic dental care. With fluoride often found in traditional toothpaste, there's a growing interest in fluoride-free alternatives enriched with natural elements like neem, tea tree oil and aloe vera-promoting a balanced and natural oral care routine." He highlighted, "Organic essential oils such as peppermint and eucalyptus, are gaining popularity for their natural antiseptic qualities, contributing not only to a refreshing taste but also to combating bacteria for fresher breath.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# नवी मुंबईतील महाराष्ट्र भवनाचे मुख्यमंत्र्यांसमोर झाले अंतरिम सादरीकरण

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

मंगळवारी नवी मुंबईत महाराष्ट्र भवन व्हावे, या गेल्या अनेक वर्षापासूनच्या मागणीला खऱ्या अर्थाने मुहर्तस्वरूप प्राप्त झाले आहे. सोमवारी मुंबई येथील सह्याद्री अतिथी गृहावर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत बैठकीत नवी मुंबईमधील वाशी येथे उभारण्यात येणाऱ्या महाराष्ट्र भवन प्रकल्पाचे भव्यदिव्य वास्तूचे अंतरीम सादरीकरण करण्यात आले, अशी माहिती यासाठी पाठपुरावा करणाऱ्या आमदार मंदा म्हात्रे यांनी दिली.



महाराष्ट्र भवनाची वास्तू कशी असेल ते मी आज प्रत्यक्ष पाहून माझ्या जीवनातला आनंद मावेनासा झाला आहे. महाराष्ट्र भवनाची वास्तू 14 मजली असून त्याचबरोबर अशा या सुंदर महाराष्ट्र भवनामध्ये अभ्यागतांसाठी स्वागत कक्ष, प्रतीक्षा कक्ष, भोजन कक्ष, प्रिफेशनल एरीया, बंक्वेट हॉल, सूट रूम, ज्यूस कॅफ, टी- कॅफ, कॉफी-कॅफ, बैठक कक्ष, ई-लायब्री, कॉनफरंन्स हॉल, फूड प्लाझा विश्रांती कक्ष, व्ही.आय.पी. रूम तसेच लोकप्रतिनिधीं सोबत येणारे त्यांचे सारथी, सहकारी, वाहन चालक किंवा कर्मचाऱ्यांकरिता ही विश्रांती रूम असणार आहेत. त्याचबरोबर अशा अनेक विविध प्रकारच्या सुसज्ज सुख-सुविधांची रेलचेल या महाराष्ट्र भवनामध्ये पहावयास मिळणार आहेत. तसेच महाराष्ट्र भवनाचे प्रथम दर्शनी भागामध्ये महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्यदिव्य बैठी पुतळा असणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने भवनामध्ये प्रवेश करताच छत्रपती शिवाजी महाराजाचे दर्शन घेऊन त्यानंतरच महाराष्ट्राची आठवण होणार असल्याचे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले.

तसेच महाराष्ट्र भवनाचा प्रश्न हा लवकरात लवकर मार्गी लागल्यामुळे अशी प्रथमच वास्तू महाराष्ट्रामध्ये उभी राहणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री तसेच सिडको व्यवस्थापकीय संचालक व अधिकारी वर्ग यांचे म्हात्रे यांनी आभार मानले. नवी मुंबई शहर वसवितांना सिडको मार्फत वाशी येथे राज्यनिहाय भवन निर्मितीसाठी भूखंड उपलब्ध करून दिले गेले. राज्य निहाय दिल्या गेलेल्या सर्व राज्यांची भवने नवी मुंबई वाशी येथे उभी आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, अशा विविध ठिकाणाहून नागरिक कामांसाठी विविध स्पर्धा परीक्षा व नोकर भरतीसाठी मुंबई येथे येत असतात. मात्र जागा नसल्याने व हॉटेलचा खर्च परवडत नसल्याने अनेक जण मिळेल तो आसरा शोधतांना दिसतात. ज्या महाराष्ट्र भवनासाठी सन 2014 पासून माझा जो लढा चालला होता त्याला आज पूर्णपणे पूर्णविराम लागला असून या महाराष्ट्र भवनाचा फायदा हा नवी मुंबईलाच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्र राज्याला होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# ठाणे-बोरिवली दुहेरी बोगद्यासाठी २३५ झाडांवर कुऱ्हाड

■मुंबई। प्रतिनिधी,

महत्त्वाकांक्षी ठाणे-बोरिवली दुहेरी बोगदा प्रकल्पास अखेर केंद्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र या कामासाठी आता १२२ ऐवजी २३५ झाडे कापावी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रातील ही झाडे आहेत.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) ठाणे ते बोरिवली अंतर केवळ २० मिनिटात पार करता यावे यासाठी ठाणे ते बोरिवलीदरम्यान ११.८ किमी लांबीचा दुहेरी भुयारी मार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पासाठी एमएमआरडीएकडून बांधकामाचे कंत्राट अंतिम करण्यात आले आहे. हैदराबाद येथील मेघा इंजिनीयरिंग इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रायव्हेट लिमिटेड ला हे कंत्राट देण्यात आले आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक केंद्रीय वन्यजीव मंडळ आणि राज्य वन्यजीव मंडळाची परवानगी मिळाली आहे. त्यामुळे आता लवकरच भूमिपूजन करून या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. दरम्यान या प्रकल्पासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात भुयारीकरणासाठी आवाढव्य टीबीएम यंत्र भूगर्भात सोडण्यासाठी २७ ठिकाणी बोअर करावी लागणार आहेत. यातील १५ बोअर सहाइंच परिघाची असून ही १५ बोअर संरक्षित क्षेत्र तसेच पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात असून यासाठी उद्यान क्षेत्रातील १२२ झाडे कापावी लागणार असल्याची माहिती राज्य वन्यजीव मंडळाकडे एमएमआरडीएने सादर केलेल्या प्रस्तावातून समोर आले होते.

आता मात्र कापल्या जाणाऱ्या झाडांच्या संख्येत वाढ झाल्याची माहिती समोर आली आहे. आता १२२ ऐवजी २३५ झाडे कापली जाणार आहेत. कापल्या जाणाऱ्या झाडांच्या मोबदल्यात एमएमआरडीएला इतरत्र वनीकरण करावे लागणार आहे. त्यानुसार संभाजी नगर येथील फुलंब्रीतील उमरावती येथील ३५.५३ हेक्टर जागा वनीकरणासाठी निश्चित करण्यात आली आहे.

# आंघोळीला गरम पाणी देण्यावरुन झालेल्या वादातून पतीचा पत्नीवर सुरीने खूनी हल्ला

■ठाणे। प्रतिनिधी,

आंघोळीला गरम पाणी ठेव आणि माळ्यावरुन तेलाचा डबा काढून द्या, असे पत्नी कुसूम मालुसरे (२७) हिने पती ज्ञानेश्वर मालुसरे (३७) यांना सांगितले. आपल्याला काम सांगितल्याचा राग आल्याने त्याने तिला शिवीगाळी केली.

त्यावर शिवीगाळी करु नको, असे बजावणाऱ्या पत्नीच्या गळ्यावरच चाकूने वार करीत तिच्या खूनाचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी कोपरीमध्ये घडली. याप्रकरणी पती ज्ञानेश्वर याला अटक केल्याची माहिती कोपरी पोलिसांनी सोमवारी दिली. ठाणे पूर्वेकडील कोपरी येथील आनंदनगर परिसरातील रहिवाशी ज्ञानेश्वर याचा ४ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास त्याच्या पत्नीसोबत कौटुंबिक



वाद झाला होता. पत्नीने माळ्यावरुन तेलाचा डबा काढून द्या आणि आंघोळीसाठी गरम पाणी ठेवा, असे त्याला काम सांगितले. हे काम सांगितल्यामुळे हा वाद विकोपाला गेला. यातूनच ज्ञानेश्वर याने पत्नीचे तोंड दाबून गळ्यावर सुरीने वार करुन तिला ढकलून दिले. घराचा दरवाजाही बंद केला.

त्यानंतर तिच्या छातीच्या खाली पोटावर डाव्या बाजूलाही त्याने सुरीने वार करुन खूनाचा प्रयत्न केला. या प्रकारानंतर लादीवर सांडलेले रक्त बारदाणाने पुसून लादीही त्याने साफ केली. रक्ताने माखलेले बारदाण, तिचे कपडे आणि सुरी त्याने आनंदनगर येथील नाल्यामध्ये फेकून देत पुरावाही नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

कहर म्हणजे 'पोलिसांमध्ये तक्रार देऊ नकोस, नाहीतर तुला मारुन टाकीन, जिवंत सोडणार नाही', असा दमही तिला भरला. या घटनेनंतर कुसूम हिला स्थानिकांनी तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असून तिच्यावर उपचार करण्यात येत आहेत. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन हल्लेखोर पतीला ताब्यात घेतले.

# बंदुकीचे सर्वाधिक परवाने ठाणे आणि कल्याण, डोंबिवलीत; बंदूक स्वसंरक्षणासाठी की खोट्या प्रतिष्ठेसाठी?

■ठाणे। प्रतिनिधी,

उल्हासनगर येथील हिललाईन पोलीस ठाण्यात आमदार गणपत गायकवाड यांनी त्यांच्या परवाना असलेल्या बंदूकीने शिवसेनेचे पदाधिकारी महेश गायकवाड यांच्यावर गोळीबार केला. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणानंतर ठाणे आयुक्तालय क्षेत्रात देण्यात आलेल्या शस्त्र परवान्यांचा प्रश्न देखील समोर आला आहे. आयुक्तालय क्षेत्रात आतापर्यंत एकूण ४ हजार ३५० जणांना स्व-संरक्षणासाठी बंदूक परवाने दिले असून सर्वाधिक परवाने ठाणे शहरात देण्यात आले आहे.



त्यांची संख्या १ हजार ९०० इतकी आहे. तर डोंबिवली आणि कल्याण शहरात १ हजार ३०० जणांना बंदूक परवाने देण्यात आले आहेत. यातील काहीजण खोट्या प्रतिष्ठेसाठी बंदूका वापरत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे या परवान्यांच्या पडताळणीचे आदेश पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. कल्याण येथील जमीनीच्या वादातून आमदार गणपत गायकवाड यांच्या स्वतःकडील बंदुकीने शिवसेनेचे पदाधिकारी महेश गायकवाड यांच्यावर गोळ्या झाडल्या. महेश गायकवाड हे खासदार श्रीकांत शिंदे यांचे अत्यंत जवळचे मानले जातात. हिललाईन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल जगताप यांच्या कार्यालयामध्येच हा प्रकार घडल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. ठाणे आयुक्तालया क्षेत्रात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी येथील शहरी भाग येतो. या क्षेत्रामध्ये एकूण ४ हजार ३५० बंदूक परवान्यांचे आतापर्यंत वाटप करण्यात आले आहे. यातील बहुतांश परवाने राजकीय पक्षाशी निगडीत असलेले पदाधिकारी, बांधकाम व्यवसायिक यांच्याकडे आहेत. तर काही परवाने निव्वळ खोट्या प्रतिष्ठेसाठी घेण्यात आल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. त्यामुळे बंदूक परवान्यांविषयी आता ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी परवाने पडताळणीचे आदेश दिले आहेत. या पडताळणीमुळे आता काही परवाने निलंबित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# प्रेमसंबंधातून टिटवाळ्यातील तरूणाचे अपहरण




■कल्याण। प्रतिनिधी,

टिटवाळा येथील एका तरूणाचे जातीबाह्य मुलीबरोबर पाच वर्षापासून प्रेमसंबंध होते. मुलीच्या कुटुंबीयांना हे प्रेमसंबंध मान्य नव्हते. मुलगी या मुलाशीच विवाह करण्याच्या विचारात असल्याने मुलीच्या कुटुंबियांनी प्रेमसंबंध ठेवणाऱ्या तरुणाचे अपहरण केले. त्याला भिवंडी जवळील पडघा येथील जंगलात नेऊन त्याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. सोमवारी सकाळी ही घटना कल्याण-टिटवाळा रस्त्यावरील वडवली येथील उड्डाण पुलावर घडली आहे. या प्रकरणात पुष्पराज राहुल जाधव या तरूणाने टिटवाळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पुष्पराजचा अल्पवयीन भाऊ हा गंभीर जखमी झाला आहे.

अल्पवयीन मुलाचे आणि संबंधित मुलीचे प्रेम संबंध होते. या प्रकरणात नीतेश जाधव, परेश ठाकरे, पंकज आणि इतर तीन जणांना आरोपी करण्यात आले आहे. पोलिसांनी सांगितले, अल्पवयीन मुलाचे आणि एका मुलीचे प्रेमसंबंध होते. हे प्रेमसंबंध जातीबाह्य असल्याने मुलीच्या कुटुंबियांनी या प्रेमसंबंधांना विरोध केला होता. तरीही मुलगी या मुलाच्या संपर्कात होती. याचा राग कुटुंबीयांना होता. गोवेली येथील जीवनदीप महाविद्यालयात मुलगा शिक्षण घेतो. मुलीला मुलापासून अलिप्त करण्याचे प्रयत्न सुरू होते.

सोमवारी सकाळी ११ वाजता तक्रारदार पुष्पराज जाधव, त्याचा अल्पवयीन प्रेमसंबध प्रकरणातील भाऊ, समीत मगर, मुबीन मणियार, प्रणव भोईर हे शुभम तरे याची स्वीफ्ट डिझायर कार घेऊन कल्याणला बर्गर खाण्यासाठी चालले होते. वडवली उड्डाण पुलावरून जात असताना पुष्पराज याच्या मोटारी समोर एक मोटार आडवी येऊन उभी राहिली. त्याचवेळी पाठीमागील भागात एक मोटार उभी करण्यात आली.

आपणास कोणीतरी आडवे आले म्हणून तक्रारदार थांबला. त्यावेळी समोरील वाहनातून आरोपी नीतेश जाधव उतरले. त्यांनी प्रेमसंबंध प्रकरणातील अल्पवयीन मुलाला जबरदस्तीने खाली उतरवले.

# 'हिंमत असेल तर स्वतःचा पक्ष स्थापन करून निवडणूक लढवा', जितेंद्र आव्हाडांचे अजित पवारांना खुले आव्हान!

■ठाणे। प्रतिनिधी,

शरद पवार हे जर हुकूमशहा आहेत तर त्यांनी स्थापन केलेला पक्ष आणि त्यांनी देशभर पोहचविलेले निवडणूक चिन्ह वापरून निवडणुका लढविण्याची भाषा का करता, असा प्रश्न उपस्थितीत करत हिम्मत असेल तर स्वतःचा पक्ष स्थापन करून स्वतंत्र निवडणूक चिन्हावर लढून दाखवा, असे खुले आव्हान राष्ट्रवादी (शरद पवार गट) चे राष्ट्रीय सरचिटणीस जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवार यांना दिले.

अजित पवार यांनी बारामतीमध्ये भाषण करताना आपणच निवडणुकीत उभे आहोत, असे समजून मतदान करा, असे आवाहन केले आहे. त्याला आव्हाड यांनी प्रतिउत्तर दिले आहे. निवडणूक आयोगात पात्र- अपात्रतेसंदर्भात लढाई सुरू आहे. त्या अनुषंगानेच अजित पवार गटाने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात , शरद पवार यांच्यावर हुकूमशहाचे आरोप केले. शरद पवार हे कुणाचे ऐकत नाहीत. ते सर्व निर्णय एकट्यानेच घेतात, असे आरोप करण्यात आले आहेत. या प्रतिज्ञापत्रावर पहिली सही सुनील तटकरे यांनी केली आहे. ज्या तटकरेंनी पहिली सही केली आहे, त्यांनाच शरद पवार यांनी दोनवेळा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केले होते. मंत्रिपदही दिले होते. त्यांच्या मुलीला आमदारकी आणि मंत्रिमंडळात मानाचे स्थान दिले होते. एवढं सगळं घेऊनही सुनील तटकरे




हे शरद पवार यांना हुकूमशहा कसे काय म्हणू शकतात, असा प्रश्नही आव्हाड यांनी उपस्थितीत केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षाचे जन्मदाते शरद पवार हेच आहेत. त्यांनीच पक्षाला निवडणूक चिन्ह मिळवून दिले आहे. आता हाच पक्ष आणि चिन्ह ताब्यात घेण्याचा प्रयत्न अजित पवार हे करीत आहेत. अजित पवार नेहमीच म्हणत असतात की ते खोटं बोलत नाहीत. मग, त्यांनी खरं सांगावे की त्यांना कोणी घडविले. त्यांचे स्वतःचे योगदान काय आहे, या देशात केवळ दोन -तीनच नेते असे आहेत की त्यांनी बंड करून आपले अस्तित्व टिकवले आहे. त्यामध्ये शरद पवार अग्रस्थानी आहेत. काँग्रेसशी फारकत घेऊन नवीन पक्ष स्थापन केल्यानंतर अवघ्या वर्षभरातच त्यांनी पक्षाला सत्तास्थानी बसवून अजित पवार यांना मानाचे स्थान दिले होते. शरद पवार यांचे निर्णय लोकाभिमुख होते. पण, अजित पवार यांनी सुप्रमा अर्थात सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या नावाने गोंधळ घातला असल्याचा आरोप देवेंद्र फडणवीस यांनीच केले आहेत, असेही आव्हाड म्हणाले. शरद पवारांवर खोटे आरोप करणाऱ्यांनी जाहीरपणे सांगावे की पवारांच्या घरी सकाळपासूनच जाणारे ते आठजण कोण होते? जेवढी मोकळीक पवार यांनी दिली होती, तेवढी कोणत्याच पक्षात नाही. हीच मोठी चूक झाली.

# निमार्णाधीन इमारतीला आग तीन तासांच्या प्रयत्नांनी आगीवर नियंत्रण

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

शिरवणे एमआयडीसीतील एका इमारतीला लागलेली आग तीन तासांच्या नंतर विझवण्यात अग्निशमन दलास यश आले. सोमवारी रात्री साडे नऊ च्या सुमारास ही आग लागली होती. या इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कोणी राहात नव्हते. नवी मुंबई लगत असलेल्या ठाणे बेलापूर औद्योगिक पट्ट्यात असणाऱ्या शिरवणे एमआयडीसी डी ब्लॉक येथे एक उतुंग टॉवर बनवण्याचे काम सुरु आहे. सोमवारी रात्री नऊ



साडे नऊच्या सुमारास विसाव्या माळ्यावर आग लागली. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने येथे कोणीही राहत नाही.

त्यामुळे मोठ्या प्रमाणावर बांधकाम साहित्य आगीच्या भक्ष्य स्थानी पडले. एमआयडीसीची स्वतःची अग्निशमन यंत्रणा आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यास फार उशीर लागू शकत नव्हता मात्र एवढ्या उंचावर आग विझवण्यासाठी लागणारी अग्निशमन यंत्रणा त्यांच्या कडे नव्हती. त्यामुळे वाशी अग्निशमन दलाची मदत घेत ग्रांटो गाडी मागवण्यात आली होती. या गाडीच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. रात्री साडे आकाराच्या सुमारास आग पूर्णपणे विझवण्यात आली होती. मात्र एवढ्या रात्री आग कशी लागली याचे कारण समजू शकले नाही, अशी माहिती वाशी अग्निशमन दलाने दिली.

# नवी मुंबईतील ४५०० अनधिकृत बांधकामे पाडणार?

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबई महापालिकाक्षेत्रात अनधिकृत बांधकामांचे पेव मोठ्या प्रमाणात फुटले असूनशहरी भागासह, मूळ गावठणाभोवती अनधिकृत बांधकामांची संख्या मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. नुकतीच नेरुळ सेक्टर १६ येथे पालिकेच्या उद्यानाच्या भूखंडावर झालेल्या अनधिकृत इमारती खाली करण्यात आल्याची कारवाई ताजी असतानाच उच्च न्यायालयाने ३१ डिसेंबर २०१५ आधीची आणि नंतरची किती बेकायदा बांधकामे बांधली गेली आहेत याचे सर्वेक्षण करा तसेच २०१५ नंतरच्या बेकायदा बांधकामांवर कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने नवी मुंबई महापालिकेला दिले आहेत. त्यामुळे नवी मुंबईत सुमारे ४५०० अनधिकृत बांधकामे असल्याने याबाबत पुन्हा एकदा अनधिकृत बांधकामांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

नवी मुंबई शहरात बांधकामांची परवानगी न घेताच बांधकामे पूर्ण झालेल्या तसेच काही बांधकामे सुरु असलेल्या बेकायदा बांधकामावरही कारवाई करण्याचे आदेश मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने पालिकेला दिले आहेत. त्याच प्रमाणे नवी मुंबई महापालिकेकडे ३१ डिसेंबर २०१५ च्या आधीची बेकायदा बांधकामे दंड आकारुन नियमित करण्याचा मागणीसाठी किती अर्ज केलेत याचा तपशीलही सादर करण्याचे आदेश पालिकेला दिले आहेत. नवी मुंबई शहरातील अनधिकृत बांधकामाबाबत किशोर शेट्टी यांनी केलेल्या याचिकेबाबत न्यायालयाने पालिकेला वरील निर्देश दिले आहेत.

उच्च न्यायालयाने नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही सुरू करण्यात आली असून सर्वेक्षण करुन शहरातील अनधिकृत बांधकामांवर नियमानुसार कारवाई होणार असल्याचा इशारा डॉ. गेठे यांनी दिला आहे.

अनेक वर्षे एकच अधिकारी अतिक्रमण विभागात ठाण मांडून बसल्यामुळे अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली जात नसल्याचा आरोप होत होता. महापालिका विभाग अधिकारी मात्र बेकायदा बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ व ५४ अंतर्गत नोटीस बजावतात. परंतु एकीकडे नोटीसींचा फार्स सुरु असताना दुसरीकडे बेकायदा बांधकामे सातत्याने वाढत असल्याचे चित्र आहे.

# आमदार गायकवाड गोळीबार प्रकरण: काँग्रेसकडून निषेध करून मौन आंदोलन

❖उल्हासनगर। प्रतिनिधी,

शहरातील हिललाईन पोलीस ठाण्यात सत्ताधारी पक्षाच्या आमदाराने केलेल्या गोळीबाराचा काँग्रेसकडून निषेध व्यक्त करून कुठे नेवून ठेवलाय महाराष्ट्र माझा? असा प्रश्न काँग्रेसचे आमदार रविंद्र धंगेकर यांनी उपस्थित केला. तसेच सोमवारी नेताजी चौकात पक्षाच्या पदाधिकार्यांनी निषेध व्यक्त करून मौन आंदोलन केले. उल्हासनगर येथील हिललाईन पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या केबिन मध्ये सत्ताधारी भाजपचे आमदार गणपत गायकवाड यांनी शिवसेना शिंदे गटाचे कल्याण पूर्व शहरप्रमुख महेश गायकवाड व हर्षल केणे यांच्यावर गोळीबार केला. यांप्रकाराने महाराष्ट्र हादरून गेला असून सत्ताधारी भाजपा व शिंदे सरकारातील कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचा आरोप काँग्रेसने केला. शहर काँग्रेस पक्षाने सोमवारी दुपारी ३ ते ५ वाजता नेताजी चौकात निषेद व्यक्त करण्यासाठी मौन आंदोलन केले आहे. यावेळी पक्षाचे आमदार रवींद्र धनगेकर यांनी कुठे नेवून ठेवला महाराष्ट्र माझा. असा प्रश्न करून सत्ताधारी कारभारावर प्रश्नचिन्हे केला. शहरजिल्हाध्यक्ष रोहित साळवे, गटनेते अंजली साळवे, कल्याण जिल्हा अध्यक्ष सचिन पोटे, राष्ट्रवादी पवार गटाचे नेते महेश तपासे, यांच्यासह पक्षाचे




पदाधिकारी उपस्थितीत होते. नेताजी चौकातील निषेध व मौन आंदोलनाला पक्षाचे वज्जरुद्दीन खान, किशोर धडके, नाणिक आहुजा, अंजली साळवे, सिंधुताई रामटेके, मनीषा महाकाले, कुलदीप ऐलसिंघानी, महेश मीरानी, अझीझ खान, शहबुद्दीनं खान, जयप्रकाश अनार्डे, हितेश मटा, कमला मेलकुंदे, नारायण गेमनानी, आशाराम टाक, राजेश मल्होत्रा, अमर जोशी, विशाल सोनावणे, दीपक सोनावणे ,अख्तार खान, आबा साठे, संतोष मिंडे, राकेश मिश्रा, रोहीत ओव्हाळ, डॉ. धीरज पाटोळे, फझल खान, फरियाद शेख, प्रदीप बागुल, शाम माधवी, फामिदा शेख, ईश्वर जग्याशी, दीपक गायकवाड, अन्सर शेख, संतोष वानखेडे, रणजीत साळवे, किशोर ढवारे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाण्यात न्यूयॉर्क-लंडनसारखं फीलिंग; २१ एकरांवरील ग्रँड सेंट्रल पार्कचा मुहूर्त ठरला

■ठाणे। प्रतिनिधी,

साडेतीन हजारांपेक्षा अधिक विविध प्रकारची झाडे, फुलझाडे... मुलांसाठी खेळायला भरपूर जागा... ज्येष्ठांना चालण्यासाठी जॉगिंग ट्रॅक... देशातील सर्वांत मोठा स्केटिंग यार्ड... लॉनटेनिस, व्हॉलीबॉल कोर्ट यांच्यासह योग, ध्यान धारणेसाठी स्वतंत्र विभाग अशा सोयीसुविधांनी युक्त तब्बल २०.५ एकर जागेवरील भव्यदिव्य सेंट्रल पार्क ठाण्यात साकारण्यात आले आहे. ठाणेकरांना वृक्षांनी नटलेल्या या पार्कमध्ये मुक्त फेरफटका मारता येणार आहे. त्यामुळे नागरिकांना हक्काचे पर्यटन केंद्र लाभणार असून येत्या ८ फेब्रुवारी रोजी सेंट्रल पार्कचा लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

ठाण्यात एका बाजूला उल्हास नदीचे खाडीपात्र आणि हिरवाईने नटलेला संजय गांधी राष्ट्रीय अभयारण्याचा परिसर असताना आता शहराच्या निसर्गसौंदर्यात भर घालणारे तब्बल २०.५ एकरवरील भव्य ग्रँड सेंट्रल पार्क कोलशेत येथे ठाणेकरांसाठी खुले होत आहे. साडेतीन हजारांहून अधिक विविध प्रकारची झाडे या सेंट्रल पार्कमध्ये असून वर्षाला अंदाजे आठ लाख ८४ हजार पौंड ऑक्सिजननिर्मिती या पार्कमधील हिरव्यागार वनराईतून होणार असल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत होणार आहे. या पार्कमध्ये लहान मुलांपासून तरुण, ज्येष्ठांसाठी विविध विभाग साकारण्यात आले आहेत. प्रत्येकाच्या आवडीनिवडीनुसार खेळ, जॉगिंग, योग, ध्यानधारणा याठिकाणी करता येणार आहे. काश्मीरचे मुघल गार्डन, चायनीज थीम उद्यान, मोरोक्कन संस्कृतीची ओळख करून देणारे मोरोक्कन थीम उद्यान, जपानी पार्क हे येथील प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

# फलकबाजीमुळे डोंबिवली शहराचे विद्रुपीकरण, रेल्वे स्थानक भागात फेरीवाल्यांकडून कचरा

■डोंबिवली। प्रतिनिधी,

डोंबिवली शहराच्या मुख्य वर्दळींच्या रस्त्यावर कार्यक्रमांची प्रसिद्धी करणाऱ्या कमानी, शहरांच्या कोपऱ्यांवर फलक लावून काही संस्थांनी शहराचे विद्रुपीकरण केले आहे. या फलकांवर पालिकेकडून कारवाई होत नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत. डोंबिवली शहरातील फडके रस्ता, बाजीप्रभू चौक, इंदिरा चौक, मानपाडा रस्ता हे वर्दळीचे भाग आहेत. त्यामुळे याठिकाणी विविध संस्था, राजकीय मंडळींचे फलक सातत्याने लावण्यात येऊन शहराचे विद्रुपीकरण केले जाते. स्कायवॉकच्या कमानीला सतत फलक लोंबकळत असतात. यामधील अनेक फलकांचे जाहिरात शुल्क पालिकेकडे संबंधितांकडून



भरणा केले जात नसल्याच्या तक्रारी आहेत. काही फलक हे राजकीय आहेत. त्यांच्यावर कारवाई केली तर स्थानिक पदाधिकारी फलक काढणाऱ्या पालिका कर्मचाऱ्याला फैलावर घेतो. या अनुभवामुळे पालिका कर्मचारी या फलकांकडे पाहण्या व्यतिरिक्त भूमिका घेत नसल्याचे समजते. शहर स्वच्छ, सुंदर दिसण्यासाठी पालिका प्रशासन प्रयत्नशील आहे. दुसरीकडे शहरात फलकबाजी करणाऱ्या मंडळींची संख्या मोठ्या संख्येने वाढली आहे. डोंबिवली पश्चिमेत दिनदयाळ चौक, फुले चौक, जुने विष्णुनगर पोलीस ठाणे, कोपर पूल भागात सतत फलक लावून काही संस्था, राजकीय मंडळी शहराचे विद्रुपीकरण करत आहेत. शहराचे विद्रुपीकरण करणार नाही, अशी हमी विविध राजकीय पक्षांनी उच्च न्यायालयात देऊनही त्यांचे कार्यकर्ते स्थानिक पातळीवर डोंबिवलीत फलकबाजी करून विद्रुपीकरण करत आहेत.

शहर विद्रुप करणाऱ्यांवर कठोर कारवाईसाठी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पुढाकार घेण्याची मागणी नागरिक करत आहेत. डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागात फेरीवाले रात्री उशिरापर्यंत व्यवसाय करतात.

